अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# मुद्दा साधा कांद्याचा पण तितकाच कायद्याचा

अनेकवेळेला आपण भारत हा विविधतेने नटलेला देश आहे असे म्हणत असतो. अनेक प्रकारचे लोक, भाषा, पंथ, जाती आणि त्यांच्या चालीरिती इथपासून ते प्रचंड प्रमाणावर असलेली निरक्षरता अशा अनेक गोष्टींबाबत ही विविधता पहायला मिळते. आणि मग कोण काय करेल, कोणता मुद्दा उचलून प्रसिध्दी मिळवेल, याचा काहीच भरोसा देता येत नाही. अशावेळी संसदेपासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत किंवा विद्यापीठांपासून ते वेगवेगळ्या सरकारी खात्यांची अडचण होत असते. कारण अशा सगळ्या प्रकारच्या लोकांशी सामना करणे, त्यांच्या मागण्या तक्रारी किंवा आशा, अपेक्षा पूर्ण करणे हे प्रत्येकवेळीच शक्य होते असे नाही. या संदर्भातले ताजे उदाहरण म्हणजे दिल्लीतल्या एका वकीलाने वाढणाऱ्या कांद्यांच्या भाववाढीविरोधात थेट न्यायालयात धाव घेतली आणि हे भाव कमी करण्याकरता न्यायालयाने हस्तक्षेप करावा, अशीच थेट मागणी केली. तसे पाहिले तर त्या व्यक्तीने मांडलेला मुद्दा साधा होता. पण प्रश्न कांद्याचा होता. आणि तितकाच तो कायद्याचाही होता. कांद्यासारख्या मुद्यावर न्यायालयात जावे असे त्या वकीलाला का वाटले हा स्वतंत्र मुद्दा ठरतो. लोकशाहीमध्ये न्याय मिळवण्याचा शेवटचा पर्याय म्हणून न्यायालयेच आधार ठरतात. यासाठी लोकशाही व्यवस्थेने जनहित याचिका नावाचा प्रकार उपलब्ध करून दिला आहे. अनेक लोक या माध्यमाचा उपयोग करून न्यायालयात जात असतात. त्यातले अनेक विषय हिताचे असले तरी सगळ्याच जनतेचा विचार करणारे असतातच असे नाही. परंतु, कांद्यासारख्या अतिशय किरकोळ आणि साध्या प्रश्नावर न्यायालयात जाण्याचा प्रकार हा लोकांमधल्या काहीसा विचित्र आणि विक्षिप्तपणाचाच नमुना ठरतो. असे प्रकार देशभरात अनेक ठिकाणी अनेक पध्दतीने सुरू असतात. अगदी परवा परवा दिल्लीत सत्तेत आलेल्या आम आदमी पार्टीला त्याचा अनुभव आला. त्यांनी लोकांच्या तक्रारी ऐकून घेण्याकरता खास स्वतंत्र हेल्पलाईन सुरू केली. पहिल्या दिवशी त्यात अक्षरश: हजारो तक्रारींचा खच पडला. विशेष म्हणजे त्यातल्या चारशे तक्रारी या वैयक्तिक प्रेमसंबंधांबाबत असल्याचे प्रसिध्द झाले आहे. याचा अर्थ आपल्या देशामधल्या काही लोकांच्या वागण्याबोलण्यात असाही अनुभव येत असतो. कांद्याविषयी न्यायालयात जाणाऱ्या त्या वकिलाला न्यायालयाने खडे बोल सुनावले. आणि कांद्याचे भाव कमी व्हावे असे वाटत असेल तर त्यांनीच दोन महिने आधी कांदा खाणे बंद करावे म्हणजे कांद्याच्या किंमती आपोआप कमी होतील. अर्थात न्यायालयाकडून असे उत्तर अपेक्षित होते की, नव्हते हा भाग आणखीनच वेगळा ठरतो. परंतु कांद्यासारखे विषय न्यायालयापुढे आणून न्यायालयाचा वेळ वाया घालवू नका, असे त्या न्यायाधीशांना सुचवायचे होते. त्यांच्या म्हणण्यामध्ये पुरेसे तथ्य आहे.

### न्यायालयाचा वेळ आणि प्रलंबित खटले

आज अशा अनेक जनहित याचिका असतात की, ज्या केवळ प्रसिध्दीच्या हेतूने दाखल केल्या जातात. त्यामागे जनहितापेक्षा स्वत:च्या प्रसिध्दीचे हित जास्त असल्याचे दिसून येते. अगदी एखाद्या मंत्र्याने कोणत्या भाषेतून शपथ घ्यावी या विषयांपासून ते पंतप्रधानांच्या भाषणातील एखाद्या वाक्यावरून थेट जनहित याचिका दाखल करण्याचे प्रकार घडतात. न्यायालयांमधून ज्या महत्त्वाच्या विषयांचा किंवा खटल्यांचा निपटारा व्हायला हवा तो होत नाही. अक्षरश: वीस-वीस-पंचवीस वर्षे महत्त्वाचे खटले प्रलंबित राहतात. भ्रष्टाचाराच्या विषयांवरील खटल्यांचे निकाल दहा-दहा वर्षांनी लागतात. चारा घोटाळ्याचा निकाल असाच दहा वर्षांनी लागला. तर बॉम्बस्फोट खटल्यांचे निकाल अजूनही अनेक ठिकाणी रखडलेले आहेत. म्हणून न्यायालयाचा वेळ सत्कारणी लागला पाहिजे यात काही शंका नाही. आज संपूर्ण देशभरामध्ये किमान दोन लाख खटले निकालाविना पडून आहेत. कारण न्यायाधीशांची संख्या कमी आहे. सरकार त्याबाबत तातडीने निर्णय घेत नाही. खटले निकाली निघावेत म्हणून सरकारी यंत्रणाही वेगाने काम करीत नाही. शेवटी नाईलाजाने अशा काही गोष्टींच्या निकालांसाठी फास्ट ट्रॅक म्हणजे जलदगती न्यायालये स्थापन करावी लागतात. काही ठिकाणी तर गाव पातळीवरचे वैयक्तिक प्रश्न सोडवण्यासाठी लोकन्यायालयांच्या माध्यमातून प्रश्न हातावेगळे करण्याचा प्रयत्न केला जातो. तरीदेखील या खटल्यांची संख्या आटोक्यात येत नाही. खरे तर न्यायालयांमध्ये एवढे खटले का प्रलंबित राहतात? याविरोधातच दाद मागण्याची वेळ आली आहे. न्यायालयांचा वेळ जर महत्त्वाचा असेल तर मग त्याचा योग्य उपयोग होतो किंवा नाही, न्यायदानाच्या प्रक्रियेमध्ये वेळापत्रकालाही काही महत्त्व आहे की नाही, असे प्रश्न निर्माण होतात. तेही लक्षात घ्यावे लागेल.

### पण मग वाढत्या महागाईचे काय

अशावेळी एकूणच न्यायालयाच्या सर्वंकष रचनेचा विचार करण्याचीही वेळ येते. कांद्यासारख्या रोजच्या आहारात किंवा जेवणामध्ये लागणाऱ्या सामान्य गोष्टीचे भाव कमी व्हावेत म्हणून न्यायालयात जाण्याची इच्छा एखाद्या वकिलाला होते. त्यातल्या त्या वकिलाचा हेतू प्रसिध्दीचा असेल असे गृहित धरले तरीसुध्दा अशा सामान्य मुद्यावर एखाद्या सामान्य माणसाला न्याय मागण्याची इच्छा झाली तर मग त्याने काय करावे? असाही प्रश्न निर्माण होतो. सरकार काही करत नाही. भडकणारी महागाई परवडत नाही. मग शेवटी न्यायालयाला तरी विचारून पहावे असा त्यामागचा हेतू असू शकतो. कदाचित न्यायालयाला त्या वकिलाच्या स्वभावविशेषाची माहिती असावी म्हणूनच त्यांनी त्याची याचिका फेटाळून लावली. मात्र यानिमित्ताने न्यायालयाने भडकणाऱ्या महागाईविषयी सरकारच्याही श्रीमुखात भडकावली असती तर फार बरे झाले असते. कारण आज सामान्य माणूस अक्षरश: जेरीला आलेला आहे. आता कांद्यासारख्या मुद्यावरून न्यायालयाचा वेळ जाऊ नये, असे न्यायालयाला वाटत असेल तर मग अशा सामान्य तक्रारींचा निपटारा करण्यासाठीसुध्दा तशाच स्तरावरची न्यायव्यवस्था असली पाहिजे. कारण आपल्या देशामध्ये एकीकडे कायदा गाढव आहे असे म्हटले जाते. तर दुसरीकडे कायदा हाच सर्वोच्च असल्याचेही मानले जाते. कायद्यापुढे जर सगळ समान असतील आणि कांद्यासारखा प्रश्न जर सगळ्यांना समान पध्दतीने भेडसावत असेल, तर मग त्याविरुध्दचा मुद्दा अगदीच बेकायदा ठरत नाही. कोथिंबीरीपासून ते कांद्यापर्यंत अशा अनेक जीवनावश्यक वस्तूंचा भाव वाढतो आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.